MHRG190008332023

**::भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.११६/२०२० मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश ::**

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रस्तावित अर्जदार यांनी चॉदबी इस्माईल कुडुपकर मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांना प्रस्तुत अर्जात सामील करण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ रेफरन्स अर्जातील नमुद मिळकतीचे अवॉर्ड हे त्यांचे वडील इस्माईल जाफर कुडूपकर यांचे नावे जाहीर करण्यात आले आहे. इस्माईल जाफर कुडूपकर यांना दोन पत्नी होत्या. पहिल्या पत्नीपासुन त्यांना प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ व २ हे कायदेशीर वारसदार आहेत. चॉदबी इस्माईल कुडुपकर या दिनांक ०५.१०.२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. दुसरी पत्नी म्हणजेच चॉदबी इस्माईल कुडूपकर हिस अर्जातील अर्जदार क्र.३ व नियोजित अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस होतो. प्रस्तुतचा रेफरन्स अर्ज करतेवेळी कोरोना जागतिक महामारीमुळे कराड-पाटण येथे लॉकडाउनमुळे अडकलेले असल्याने सहयांसाठी उपलब्ध राहु शकले नाहीत. अर्जदार क्र.३ यांनी त्यांची एकटयाची सही प्रस्तुत अर्जाचे कामी केलेली होती. प्रस्तुत मिळकतीमध्ये नियोजित अर्जदार क्र.१ ते ३ यांचा हिस्सा अभिप्रेत असल्याने त्यांना सामील करुन घेण्याची विनंती केली आहे. मुळ रेफरन्स अर्जात त्यांना सामील करुन घेतल्यास मुळ अर्जदार यांचेवर अथवा सामेनवालाचे बचावावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही.

उलटपक्षी एकाच प्रकरणामध्ये अर्जदारांचे हक्क व संपादित मिळकतीचे मुल्यनिर्धारण करणे सोपे होईल. सदर रेफरन्स अर्जात अर्जदारांना सामील केल्यास आवश्यक असणारा वाढीव कोर्ट फी स्टॅम्प भरण्यास अर्जदार तयार आहेत. सदर वारसांशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाहीत. याकारणास्तव नियोजित अर्जदार यांना मुळ रेफरन्स अर्जाचे कामी मुळ अर्जदार यांचेनंतर अर्जदार क्र.४ ते ६ कडे सामील करण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२७ अभिलेखावर दाखल केले आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध करताना, सामनेवाला क्र.३ यांनी म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, सदर प्रकरणाची सुनावणी अंतिम पुराव्याचे टप्प्यात आहे. नियोजित अर्जदारांनी इतक्या प्रदिर्घ कालावधीनंतर न्यायालयात येण्याचे कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. अर्जदारांनी ते 'हितसंबंधी व्यक्ती' असल्याचे कोणतेही प्रथमदर्शनी पुरावे अर्जासोबत जोडलेले नाहीत. भुसंपादन कायदयाच्या तरतुदीनुसार ठराविक मुदतीतच अशा हरकती घेणे आवश्यक असते. सदर प्रकरणात नवीन पक्षकारांना सामील केल्यास संपुर्ण प्रकरण पुन्हा सुरुवातीपासुन चालवावे लागेल यामुळे या टप्प्यावर अर्जदारांना सामील करुन घेणे मुळ प्रक्रियेत जाणीवपुर्वक विलंब करणे होईल. प्रस्तुतचा अर्ज केवळ प्रकरणास विलंब करण्याच्या उद्देशाने दाखल केलेला असल्यामुळे खर्चासह अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व सामनेवाला क्र.३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील श्री.बी.टी.नवाळे व सामनेवाला क्र.३ तर्फे श्रीमती वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.३ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. प्रस्तुत मुळ अर्जाचा योग्य न्यायनिवाडा करण्यासाठी सर्व पक्षकारांना प्रकरणामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. नियोजित अर्जदार यांचा त्यांना प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट करुन घेण्याचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नियोजित अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार क्र.४ ते ६ म्हणुन सामील होण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.04.04 12:07:13 +0530

महाड
दिनांकः०२.०४.२०२६

(**श्रीमती एच.आर.जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड